| | | |
|---|---|---|
| प्राप्त दिनांक | : | १३/०६/२०१८. |
| नोंदणी दिनांक | : | १३/०६/२०१८. |
| निकाल दिनांक | : | १४/१०/२०१८. |
| कालावधी | : | ०१ वर्षे, ०४ महिने, ०१ दिवस. |
| निशाणी | : | ५२ |

महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालयात
३६ वे न्यायालय, मुंबई सेंट्रल, मुंबई
(न्यायनिर्णय कलम ३५५ फौ. प्र. सं. अन्वये

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | खटला क्रंमाक | :— | ३७३/पीडब्ल्यू/२०१८.<br>MHMM26-000942-2018. |
| (ब) | अपराध घडल्याची तारीख | :— | ०८/०७/२०१७. |
| (क) | फिर्यादीचे नाव<br>(अभियोग पक्ष) | :— | महाराष्ट्र सरकार,<br>द्वारा — वरिष्ठ पोलीस निरिक्षक,<br>लोहमार्ग पोलीस ठाणे, बांद्रा.<br>(गुन्हा नोंद क्र.—३४८/२०१७). |
| (ड) | आरोपींची नावे | :— | १ अस्लम मोजम सैयद.<br>वय :— २३ वर्षे.<br>काम धंदा :— निरंक.<br>रा.ठि.:— रूम क्र.२०४, ईमारत क्र.२, गोळीबार, कब्रस्तान गेटच्या बाजूला, म्हाडा, ट्रान्झिट कॅम्प, सांताक्रूझ (पू), मुंबई.<br><br>२ सुनिल बाबू मडीवाल.<br>वय :— ३५ वर्षे.<br>काम धंदा :— निरंक.<br>रा.ठि.:— रूम क्र.१४७, तीन बंगला, १४७ ईमारतीच्या मागे, खेरवाडी, खार (पू), मुंबई.<br><br>३ अशोककुमार महेन्द्रप्रसाद खरे.<br>वय :— ४९ वर्षे.<br>काम धंदा :— निरंक.<br>रा.ठि.:— आर.पी.एफ. बॅरेक क्र. १७९, रूम क्र.९, खार (पू), मुंबई. |

४ मुकेशकुमार रमेशकुमार यादव.
वय :— २६ वर्षे.
काम धंदा :— निरंक.
रा.ठि.:— आर.पी.एफ. बॅरेक क्र. १८२, रूम क्र.२०, खार (पू), मुंबई.

५ श्रीकांत कालिचरण यादव.
वय :— २७ वर्षे.
काम धंदा :— निरंक.
रा.ठि.:— आर.पी.एफ. बॅरेक क्र. १८२, रूम क्र.२०, खार (पू), मुंबई.

| | | |
|---|---|---|
| (प) | कोणत्या स्वरूपाचा गुन्हा आहे ? | :— भारतीय दंड विधान कलम ३८४, ३४२, ३२३ सह ३४ प्रमाणे. |
| (फ) | सर्व आरोपींना गुन्हा कबुल आहे का ? | :— सर्व आरोपींना गुन्हा कबुल नाही. |
| (ब) | अंतिम आदेश | :— सर्व आरोपींना गुन्हयातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| (भ) | आदेशाचा दिनांक | :— १४/१०/२०१९. |

| | |
|---|---|
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी विधीज्ञ | :— श्री गायकवाड. |
| आरोपी क्र.१, ३ ते ५ तर्फे विधीज्ञ | :— श्री हरिश व्होरा. |
| आरोपी क्र.२ तर्फे विधीज्ञ | :— श्री गोविंद शेटटी. |

न्यायनिर्णय                दि.१४/१०/२०१९.

आरोपींच्या विरूध्द् भारतीय दंड संहिता कलम ३८४, ३४२, ३२३ सह ३४ अन्वयेच्या आरोपावरून सदरचा खटला दाखल आहे.

२. सारांश स्वरूपात सरकार पक्षाचे प्रकरण कामी कथन पुढीलप्रमाणे आहे, दि.०८/०७/२०१७ रोजी, रात्री ०८.१५ वाजता, फिर्यादी बलदेव रामदेव चौहान हा त्याचे वडील, बहीण व बहीणीच्या तीन मुलांना गावी जाणेसाठी, सोडण्याकरीता त्याचे आईसह, बांद्रा

टर्मिनस येथे आला. तेथे दोन अनोळखी इसम आले व त्यांनी फिर्यादीस सांगितले की जनरल डब्यात बसणेसाठी सिट देण्यात येईल परंतू एका सिटचे ₹१००/— (शंभर) लागतील. या प्रमाणे त्या अनोळखी इसमांना कोणताही अधिकार नसताना त्यांनी जबरदस्तीने पाच जणांना जनरल डब्यात बसणेसाठी ₹५००/— (पाचशे) ची जबरदस्तीने मागणी केली. म्हणून फिर्यादीने मदतीसाठी क्र.१८२ वर तक्रार केली. त्यानंतर दोन आर.पी.एफ. कर्मचारी यांनी त्या अनोळखी इसमांना न पकडता, काही एक कारण नसताना फिर्यादीस आर.पी.एफ. बांद्रा टर्मिनस कार्यालयात नेवून, अनधिकृतपणे, डांबून ठेवले व हाताने त्यांच्या पाठीवर व गालावर मारहाण केली. सदर घटनेची फिर्याद बांद्रा, लोहमार्ग पोलीस ठाणे मध्ये नोंदवण्यात आली.

३. सदर फिर्यादीच्या आधारे सर्व आरोपींच्या विरूध्द् गुन्हा नोंद क्रं.—३४८/२०१७, भारतीय दंड विधान कलम ३८४, ३४२, ३२३ नूसार, बांद्रा, लोहमार्ग पोलीस ठाणे येथे दाखल करण्यात आला. आरोपींना गुन्ह्याकामी अटक करण्यात आली. तपासाअंती आरोपी विरूध्द दोषारोप पत्र सादर करण्यात आले.

४. माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपी विरूध्द् दोषारोप (नि.क्र.—१२) निश्चित केले. दोषारोप आरोपींना त्यांच्या बोली भाषेमध्ये वाचून व समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा कबूल केला नाही व खटला चालविण्यास (नि.क्र.—१३ ते १७) अन्वये प्रतिपादन केले. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ नूसार बयान (नि.क्र.—४७ ते ५१) अन्वये नोंदविण्यात आले, आरोपी निर्दोष असल्याचा त्यांचा बचाव आहे.

५. घटनेच्या वेळची परिस्थिती व न्यायालयासमोर आलेले साक्षी पुरावे याचे अवलोकन करून, पुढील मुद्दे निर्धारित करण्यात आले, त्याचे कारणमिमांसेसह स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने असे शाबीत केले का, कि दि.०८/०७/२०१७ रोजी, रात्री सुमारे ०८.१५ वाजता, बांद्रा टर्मिनस लोहमार्ग स्थानक, फलाट क्र.५ वर, फिर्यादी नामे बलदेव रामदेव चौहान यांना सर्व आरोपींनी संगनमताने हेतूपुर्वक, पैशाची मागणी केली व फिर्यादीस हाताने पाठीवर व गालावर मारहाण केली व अशाप्रकारे पैशाकरीता बळजबरी केली व असे करून आरोपीने भारतीय दंड विधान कलम ३८४ सह ३४ नुसार गुन्हा केला आहे? | नाही. |
| २ | अभियोग पक्षाने असे शाबीत केले का, कि सर्व आरोपींनी, संगनमताने, हेतूपूर्वक वर नमूद फिर्यादीस आर.पी.एफ. कार्यालयात अनधिकृतपणे डांबून ठेवले आणि त्या अनुषंगाने भारतीय दंड संहितेच्या कलम ३४२ सह ३४ नुसारचा गुन्हा केला आहे? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| ३ | अभियोग पक्षाने असे शाबीत केले का, कि सर्व आरोपींनी, संगनमताने, हेतूपूर्वक वर नमूद फिर्यादीस हाताने मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत केली आणि त्या अनुषंगाने भारतीय दंड संहितेच्या कलम ३२३ सह ३४ नुसारचा गुन्हा केला आहे? | नाही. |
| ४ | आदेश काय झाला? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

६. आरोपी विरूध्द् दोषारोप शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षाने एकूण तीन साक्षीदारांची म्हणजेच (फिर्यादी) बलदेव रामदेव चव्हाण (स.सा.क्र.—१) यांची साक्ष, (नि. क्र.२०) वर, (स.सा.क्र.—२) जितेंद्र रामदेव चौहाण यांची साक्ष, (नि. क्र.२५) वर आणि (तपासी अंमलदार) पो.नि. विलास गणपत पिसाळ (स.सा.क्र.—३) यांची साक्ष, (नि. क्र.३३) वर नोंदवली. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी विधीज्ञ श्री गायकवाड व आरोपी क्र. १, ३ ते ५ यांचे विधीज्ञ श्री हरिश व्होरा व आरोपी क्र. ४ याचे विधीज्ञ श्री गोविंद शेटटी यांचा युक्तिवाद ऐकला.

मुद्दे क्र.—१ ते ४ नूसार :—

७. (स.सा.क्र.—१) बलदेव चव्हाण फिर्यादी याने पुराव्यात सांगितले की, दि.०८/०७/२०१७ रोजी, तो त्याची बहीण व तिच्या

मुलांना अरावली एक्सप्रेसमध्ये बसून देण्यासाठी, वांद्रे रेल्वे स्टेशनला आला होता. रेल्वेचे जनरल डब्यात शिरण्यासाठी रांग होती. तेथे दोन तीन मुले आली व त्यांनी प्रत्येक सिटचे ₹१००/– (शंभर) दिले तर त्यांना सिट देण्यात येईल, असे सांगितले. त्याने पोलीसांना फोनवर कळविल्याने तेथे आरोपी क्र.३ गणवेशात आला, त्यामूळे सिट विकणारे लोक पळून गेले. त्याचे इतर प्रवाशांसोबत भांडण झाले होते. तो आर.पी.एफ. कार्यालयात गेला होता. त्याचे भावाने वांद्रे पोलीस ठाणेला (नि. क्र.२१) नुसार रिपोर्ट दिला होता.

८. सदर साक्षीदाराने सरकार पक्षाचे कथनास समर्थन केलेले नाही. सरकारपक्षाने घेतलेल्या उलट तपासादरम्यान त्याने नाकारले की, आरोपी क्र.४ व ५ यांना, सिट विकणारा इसम दाखविण्यात आलेला होता. त्याने हि बाब सुध्दा नाकारली की, त्यास आरोपींनी कोंडून ठेवले व मारहाण केली होती. त्याने बयानातील <u>अधोरेखांकित भाग</u> '<u>अ</u>' व पुरवणी बयानातील <u>अधोरेखांकित भाग</u> '<u>ब</u>' ते '<u>ड</u>' नाकारला. त्याने कबूल केले की, त्याची आरोपींबरोबर न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. बचाव पक्षाने घेतलेल्या उलट तपासादरम्यान त्याने सांगितले की, त्याला आरोपींनी मारहाण केली नव्हती व आरोपींनी त्याला पैसे मागितले नव्हते.

९. (स.सा.क्र.–२) जितेंद्रने पुराव्यात सांगितले की, साक्षीदार क्र १ त्याचा भाऊ असून, त्यास बांद्रा स्टेशनवर भांडण झाल्याचे समजल्याने, तो बांद्रा स्टेशनला गेला होता. परंतु त्याची फिर्यादी सोबत भेट झाली नव्हती. नंतर त्यास भाऊ घरी पोहचल्याचे समजले.

१०. अशा प्रकारे फिर्यादी (स.सा.क्र.–१) व त्याचा भाऊ (स.सा. क्र.–२) दोघांनीही सरकार पक्षाचे कथनास समर्थन केलेले नाही. आरोपीने फिर्यादींना धमकावल्याचे वा त्यांचेकडून पैसे मागितल्याचे सांगितलेले नाही. तसेच आरोपींनी त्याला कोंडून ठेवल्याचे वा डांबून ठेवल्याचे वा इच्छा पूर्वक दुखापत केल्याची बाब समोर आलेली नाही. असे सुध्दा दिसून येते की, फिर्यादी व आरोपींची कोर्टाबाहेर तडजोड झालेली आहे.

११. तपासी अंमलदार पो.नि. विलास गणपत पिसाळ (स.सा.क्र. –३) यांची साक्ष औपचारीक स्वरूपाची आहे व त्यांची साक्ष आरोपी विरूध्द दोषारोप सिध्द करण्यास पुरेशी नाही. अभिलेखावर आलेला पुरावा आरोपींच्या विरूध्दचे गुन्हे सिध्द करण्यास पुरेसा नाही. करिता मुद्दे क्र.–१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात येत आहेत. सबब, सर्व आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. म्हणून मुद्दा क्र.–४ वरील उत्तराकरीता खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१ आरोपी क्र.१. अस्लम मोजम सैयद, क्र.२. सुनिल बाबू मडीवाल, क्र.३. अशोककुमार महेन्द्रप्रसाद खरे, क्र.४. मुकेशकुमार रमेशकुमार यादव आणि क्र.५. श्रीकांत कालिचरण यादव यांना भारतीय दंड संहिता कलम ३८४, ३४२, ३२३ सह ३४ अन्वयेच्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८ (१) नूसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२ आरोपींची बंधपत्रे आणि वैयक्तिक जातमुचलके रदद् करण्यात येत आहेत.

३ आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ (अ) नुसार ₹१५,०००/– (पंधरा हजार) एवढया रकमेकरीता प्रत्येकी वैयक्तिक जातमुचलका बंधपत्र, सादर करावेत.

४ सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

स्वाक्षरी/–
(जी. पी. बावस्कार)
महानगर दंडाधिकारी,
३६वे न्यायालय, मुंबई सेंट्रल,
मुंबई.

दि.:–१४/१०/२०१९.
सराद.

श्रुतलेखन दिनांक. :– १४/१०/२०१९.
प्रतिलेखन दिनांक. :– १४/१०/२०१९.
स्वाक्षरी दिनांक. :– १६/१०/२०१९.
सराद.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Gopal Pandhari Bawaskar
Date: 2019.10.16 13:02:57 +0530